## Press Note

## Pune Metro Project Update

Pune Metro comprises of 30 stations spread over two corridors which run over a total length of approximately 33.1 km. The 17.4 km Line 1 from PCMC to Swargate corridor has a 6 km underground stretch from Shivaji Nagar to Swargate. The 15.4 km Line 2 is elevated from Vanaz to Ramwadi.

The work of Pune Metro is going in full swing. 65 per cent of the Pune Metro has been completed and soon the priority sections will be operational for passengers. These priority sections are Sant Tukaram Nagar to Phugewadi and Vanaz to Garware College. The complete Pune Metro project will wind up by December 2022.

Pune Metro from its inception stage has taken various green initiatives to protect and conserve the environment. Large scale use of solar power, water harvesting, biodigesters, plantations of trees, and green buildings are some of the notable initiatives. Pune Metro has not cut a single tree that came in the way of Metro alignment.

Pune Metro took extraordinary efforts to transplant the trees which were coming in an alignment way through innovative root-ball technology. Trees were planted in various gardens and premises made available by local authorities.  Pune Metro has so far transplanted 2261 trees. Apart from these, Pune Metro has planted more than 15,000 new trees at various locations in and around Pune city. More than 80 per cent of trees have survived after transplant.

Reach 1 physical progress is 83.12 per cent and Financial Progress is 79.50 per cent. For Reach 2 physical progress is 95.8 per cent and Financial Progress is 87.4 per cent and for Reach 3 overall 55 per cent of work is completed.  Sant Tukaram Nagar Station work is completed and Phugewadi station work is 90 per cent completed.  The priority section I (Sant Tukaram Nagar to Phugewadi) and section II (Vanaz to Garware College) work 50-60 per cent completed. 80 per cent of the tunneling work is completed.  Electric OHE work is 50 per cent completed. The Range Hill depot work is 83 per cent completed whereas 90 per cent of Hill view park depot work is completed.

# पुणे मेट्रो प्रगतीचा आढावा

पुणे मेट्रो दोन कॉरिडॉरमध्ये विभागली असून यामध्ये ३० स्थानकांचा समावेश आहे. पुणे मेट्रोची एकूण लांबी सुमारे ३३.१ किमी आहे. पिंपरी चिंचवड ते स्वारगेट या कॉरिडॉरची (कॉरिडॉर- १) लांबी 17.4 किमी असून यामध्ये शिवाजी नगर ते स्वारगेट असा ६ किमीचा भुयारी मार्ग आहे. तर वनाज ते रामवाडी (कॉरिडॉर 2) या मार्गाची लांबी १५. किमी असून हा मार्ग उन्नत आहे.

पुणे मेट्रोचे काम वेगाने सुरू आहे. आतापर्यंत पुणे मेट्रोचे ६५ टक्के काम पूर्ण झाले असून लवकरच प्रवाशांसाठी प्राधान्य विभाग (मार्ग) कार्यान्वित होणार आहेत. संत तुकाराम नगर ते फुगेवाडी आणि वनाज ते गरवारे महाविद्यालय असे हे प्राधान्य विभाग (मार्ग) आहेत. पुणे मेट्रो प्रकल्प डिसेंबर २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे .

पुणे मेट्रोने आपल्या प्रकल्प उभारण्याच्या सुरुवातीपासून पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी विविध हरित उपक्रम हाती घेतले आहेत. सौर ऊर्जेचा मोठ्या प्रमाणावर वापर, पावसाचे पाणी साठवण, बायोडायजेस्टर, वृक्षारोपण, झाडांचे पुनः रोपण आणि हरित इमारती हे काही उल्लेखनीय उपक्रम आहेत. पुणे मेट्रोच्या मार्गिकेत येणारे एकही झाड पुणे मेट्रोने तोडलेले नाही.

पुणे मेट्रोने नाविन्यपूर्ण रूट-बॉल तंत्रज्ञानाद्वारे मार्गिकेत येणाऱ्या झाडांचे पुनर्रोपण करण्यासाठी करण्यात आले आहे. स्थानिक प्रशासनाद्वारे उपलब्ध करून दिलेल्या विविध उद्यान आणि परिसरात ही झाडे लावण्यात आली आहेत. पुणे मेट्रोने आतापर्यंत २२६१ झाडांचे पुनर्रोपण पूर्ण केले आहे. याशिवाय पुणे मेट्रोने पुणे शहर आणि आसपासच्या विविध ठिकाणी १५००० हून अधिक नवीन झाडे लावली आहेत. प्रत्यारोपणानंतर 80 टक्क्यांहून अधिक झाडे जगली आहेत.

रिच 1 या मार्गिकेची काम ८३. २ टक्के पूर्ण झाले आहे. रिच २ या मार्गिकेचे काम ९५.८ टक्के आणि रिच ३ या मार्गाची एकूण काम ५५ टक्के पूर्ण झाले आहे. संत तुकाराम नगर स्टेशनचे काम पूर्ण झाले असून फुगेवाडी स्टेशनचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. प्राधान्य विभाग १ (संत तुकाराम नगर ते फुगेवाडी) आणि विभाग २ (वनाज ते गरवारे कॉलेज) येथील स्थानकांची कामे ५०-६० टक्के पूर्ण झाली आहे. मेट्रोच्या एकूण १२ किमी लांबीच्या भुयारी मार्गापैकी ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. इलेक्ट्रिक ओएचईचे (OHE) काम ५० टक्के पूर्ण झाले आहे. रेंज हिल डेपोचे काम ८३ टक्के पूर्ण झाले आहे तर हिल व्ह्यू पार्क डेपोचे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे.

या प्रसंगी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी म्हटले आहे की लवकरच पुणे मेट्रोच्या प्राधान्य मार्ग १ व २ ची कामे पूर्ण करून मेट्रो प्रवाशांसाठी मेट्रोचे कार्यान्वयन करण्यात येइल.